लोकमत | नागपूर, शुक्रवार, दि. १९ जुलै २०२४ | २

# पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीची सुचना

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर

मे. मॉडर्न मिनरल इंडस्ट्री, मिलन हॉलच्या मागे, हबीब नगर, टेका नाका, नागपूर-440017 यांनी त्यांच्या प्रस्तावित 1.62 हेक्टर खाण लीज क्षेत्रात 3174 टन/ वर्ष क्षमतेच्या देऊळगांव लोह खनिज खाण प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्याकरिता म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज सादर केला आहे. सदर प्रकल्पामुळे आरमोरी तालुक्यातील देऊळगाव, डोंगरसावंगी, ठाणेगांव, डोंगरगांव, चुरमुरा, वसाळा, इंजेवारी, पेठ, किटाडी व आकापूर, ता. आरमोरी, जि. गडचिरोली ही गावे प्रभावित होणार आहेत. सदरील प्रस्तावित प्रकल्पाकरिता भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि. 14 सप्टेंबर, 2006 च्या अधिनियमान्वये व दि. 01 डिसेंबर, 2009 च्या सुधारित अधिनियमान्वये उपरोक्त प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करण्यात येत आहे.

सदर जनसुनावणी पर्यावरण विषयक मुद्यांबाबत घेण्यात येत असून सदर नियोजित प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयक काम करण्याऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पासंबंधी टिका-टिप्पणी किंवा आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरुपात नोंदविता येईल.

सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत 30 दिवसांच्या आत खालील पत्त्यावर नोंदविण्यात याव्यात.

**प्रादेशिक कार्यालय व उप-प्रादेशिक कार्यालय**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा,**
**बस स्टॅण्ड समोर, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर 442401**
**फोन नं. 07172-251965**
**ईमेल : rochandrapur@mpcb.gov.in & srochandrapur@mpcb.gov.in**

मौखिक किंवा लेखी आक्षेप जाहिर जनसुनावणीच्या वेळेस सुध्दा नोंदविता येईल. जाहिर जनसुनावणी खालील ठिकाणी घेण्यात येईल.

| | |
|---|---|
| दिनांक | : 20/08/2024 |
| वेळ | : सकाळी 11.00 वाजता. |
| स्थळ | : प्रकल्प स्थळ, मौजा देऊळगांव, ता. आरमोरी, जि. गडचिरोली. |
| वे.बॅक्स परमिटींग नंबर | : 2513 360 4178 |
| पासवर्ड | : 20082024 |

**Webex Meeting link**
**https://mpcb.webex.com/mpcb/j.php?MTID=m5702e284e81770828387bf45e3a7165c**

सदर प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक माहिती असलेले दस्तावेज खालील कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ति या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये सदर दस्तावेज अभ्यासु शकतील.

1) पर्यावरण विभाग, 15 वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रायल, मुंबई-400032
2) सह-संचालक (जल प्रदुषण नियंत्रण) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, 2 रा व 4 था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई-400022
3) प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, VCA समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर
4) प्रादेशिक कार्यालय व उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ उदयोग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर
5) जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली.
6) जिल्हा परिषद, गडचिरोली.
7) जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली.
8) उप-विभागीय कार्यालय, ता. आरमोरी, जि. गडचिरोली.
9) तहसिल कार्यालय, आरमोरी, ता. आरमोरी, जि. गडचिरोली.
10) नगर पंचायत कार्यालय, आरमोरी, ता. आरमोरी, जि. गडचिरोली.
11) गट-ग्रामपंचायत कार्यालय, इंजेवारी (इंजेवारी व पेठ), ता. आरमोरी, जि. गडचिरोली.
12) गट-ग्रामपंचायत कार्यालय, किटाडी (आकापूर) ता. आरमोरी, जि. गडचिरोली.
13) ग्राम पंचायत कार्यालय, देऊळगांव, ता. आरमोरी, जि. गडचिरोली.
14) ग्राम पंचायत कार्यालय, डोंगरसावंगी, ता. आरमोरी, जि. गडचिरोली.
15) ग्राम पंचायत कार्यालय, ठाणेगांव, ता. आरमोरी, जि. गडचिरोली
16) ग्राम पंचायत कार्यालय, डोंगरगांव, ता. आरमोरी, जि. गडचिरोली
17) ग्राम पंचायत कार्यालय, चुरमुरा, ता. आरमोरी, जि. गडचिरोली
18) ग्राम पंचायत कार्यालय, वसाळा, ता. आरमोरी, जि. गडचिरोली
19) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ - **www.mpcb.gov.in**

स्वा/-
**उप-प्रादेशिक अधिकारी**
**म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी.**